# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-6465145/46

E-mail : ronagpur.dte@gmail.com

कार्यासन दु. क्र. 0712-6465145

Website: rdtenagpur.org.in


**(अत्यंत तातडीचे)**

**कालमर्यादा दिनांक : २९.०६.२०१६**

क्र. : तशिस/प्राकाना/शैवि-२/वृक्षलागवड/२०१६/ 1853

दिनांक :- 29 JUN 2016

प्रति,

प्राचार्य,
सर्व पदविका शासकीय तंत्रनिकेतने तसेच विना अनुदानित
तंत्रनिकेतने व औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था
नागपूर. (नागपूर जिल्हा)

**विषय :- सन २०१६ मधील पावसाळयात दि. १ ते ७ जुलै २०१६ या वन महोत्सव कालावधीत वृक्ष लागवडीबाबतची माहिती पुरविणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यांत येते की, सन २०१६ मधील पावसाळयात दि. १ ते ७ जुलै या वनमहोत्सव कालावधीत दि. १ जुलै २०१६ हया एकाच दिवशी राज्यात किमान २ कोटी वृक्ष लागवड योजनेअंतर्गत प्रत्येक महाविद्यालयाने रोपे लावण्याबाबत आपणास वारंवार पत्राद्वारे तथा ई-मेलद्वारे कळविण्यांत आलेले होते. त्यानंतर या कार्यालयाने दिनांक १६ जून २०१६ रोजी घेतलेल्या विशेष सभेमध्ये वृक्ष लागवडीचे गांभिर्य देखील समजावून सांगितले होते परंतु सभेत पुरविण्यांत आलेल्या विवरणपत्राप्रमाणे फक्त ४ संस्थांनी अचुक माहिती या कार्यालयास सादर केलेली आहे. सदर माहिती सामाजिक वनीकरण विभागास सादर करतेवेळी दिलेल्या सुधारीत आदेशाप्रमाणे आता **jpeg image** मध्ये सदरहू माहिती पुनःश्च **ddsfdnagpur@gmail.com** या **ई-मेल आयडीवर (खडडे खोदल्याचे रंगीत फोटो)** उपसंचालक, सामाजिक वनीकरण, नागपूर यांना त्वरीत पाठवावी.

तसेच ज्या संस्थांनी फक्त फोटो झेरॉक्स दिलेल्या आहेत पण माहिती विहीत प्रपत्रात परिपूर्णरित्या सादर केलेली नाही तसेच ज्या संस्थांनी फक्त् माहिती पुरविलेली असून खडेडे खोदल्याचे फोटो सादर केलेले नाहीत अशा संस्थानी देखील वरीलप्रमाणे कार्यवाही करावी. जेणेकरुन वने मंत्रालयास तसेच सामाजिक वनीकरण विभाग, नागपूर यांना सदर उद्रिदष्ट पूर्ण करण्यासाठी सहकार्य होईल.

**(गुलाबराव ठाकरे)**
**सहसंचालक**
**तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,**
**नागपूर**

प्रत:-

1. उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नवीन प्रशासकीय इमारत क्र. २ विंग बी, ७ वा माळा, जिल्हा परिषदजवळ, सिव्हील लाईन्स, नागपूर-०१ यांना माहितीकरीता.
2. प्रोग्रामर, तंत्रशिक्षण वि.का.नागपूर यांना सदरहू पत्र संकेतस्थळावर अपलोड करण्याकरीता.